दैनिक सकाळ
दि. १ ऑगस्ट १९९४

# व्ही. टी. पाटील : अष्टपैलू, बहुगुणी व्यक्तिमत्त्व

श्री. व्ही. टी. पाटील ऊर्फ काकाजींच्या कार्याचा आढावा घेणे माझ्या आवाक्याबाहेरचे आहे. हिऱ्याला जसे अनेक पैलू असतात, तसे काकाजींच्या जीवन कार्याला अनेक पैलू आहेत. त्यांच्या शैक्षणिक कार्याकडे दृष्टीक्षेप टाकताच मन थक्क होऊन जाते. विद्यादानाच्या पवित्र कार्यासाठी काकाजी चंदनासारखे झिजले आहेत.

**कोल्हापूर येथील ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक विश्वनाथ तुकाराम ऊर्फ व्ही. टी. पाटील आज (गुरुवार) ९४ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यानिमित्त-**

स्त्रियांचे स्वतंत्र विद्यापीठ काढण्याचा काकाजींना ध्यास लागून राहिला होता. कारण ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाला वाव कमी. स्त्री शिक्षणाची होणारी अवहेलना पाहून काकाजींनी १९४५ ला करवीर राज्य संस्थापिका ताराराणीच्या नावाने स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विद्यापीठाची स्थापना केली.



व्ही. टी. पाटील

काकाजींचा दुसरा संकल्प ग्रामीण विद्यापीठाचा. १९४६ ला गारगोटी येथील श्री मौनी महाराजांच्या समाधीच्या परिसरात एकूण ८० एकर जमीन घेऊन मौनी महाराजांच्या नावे त्यांनी मौनी विद्यापीठाची स्थापना केली. या शाखेत-उपशाखेत पस्तीसहून अधिक संस्था आहेत. प्राथमिक शाळेपासून पदवी-पर्यंतची शिक्षणाची सुविधा तर आहेच, शिवाय विविध क्षेत्रांतील तंत्रनिकेतन व पदविका अभ्यासक्रमही चालू आहेत. भुदरगड तालुका परिसरात मौनी महाराजांचे वास्तव्य होते. या परिसरातील जंगलगिरीत काकाजींनी भगिरथ प्रयत्न करून ज्ञानाची गंगोत्री आणली.

सांगली जिल्ह्यातील शिगाव येथे १९०० मध्ये नागपंचमीच्या दिवशी काकाजींचा जन्म झाला. १९२६ ला ते बी. ए. झाले आणि त्याच वर्षी सरोजनी यांच्याशी बेनाडी येथे त्यांचा विवाह झाला. पुढे काकाजी एल.एल.बी. झाले. १९२९ ला वकिली व्यवसायाला प्रारंभ केला. थोड्याच दिवसांत एक नामांकित वकील म्हणून त्यांचा बोलबाला झाला. बार असोसिएशनचे अध्यक्षपदही त्यांना मिळाले. सतत वीस वर्षे त्यांनी वकिली केली.

आभाळाप्रमाणे फुललेल्या काकाजींच्या कार्यक्षेत्राला सरोज ऊर्फ कमलादेवीची प्रचंड साथ होती. शक्ती होती. स्वतःला मुले नाहीत याची खंत न वाटून घेता ताराराणीतील सर्व मुली त्यांनी आपल्याच

**कु. रुपाली हेग्गे**

मानल्या. कमलादेवींनी आपल्या अंगावरील सर्व दागिने आणि रोख रक्कम मिळून सात-आठ लाख रुपये ताराराणी विद्यापीठाला अर्पण केले.

काकाजींना दीर्घायुष्य व आयुरारोग्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.